## <u>प्रेस नोट</u>

दि.३०/०१/२०१८

### “ <u>पोलीस भरती सन — २०१८</u>

.”

राज्यातील प्राविण्यप्राप्त खेळाडुंना शासकीय, निमशासकीय व इतर क्षेत्रात नोकरीसाठी ५% आरक्षण देण्यासंदर्भात शासनाने शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्रमांक राक्रीधो—२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे—२, दिनांक १.७.२०१६ अन्वये, सर्वसमावेशक सुचना निर्गमित केलेल्या आहेत.

वरील शासन निर्णयातील नियम ४(पाच) नुसार खेळाडु उमेदवाराने अर्ज करण्यापुर्वीच सुधारित तरतुदींनुसार विभागीय उपसंचालक यांचेकडुन खेळाच्या प्रमाणपत्राची पडताळणी करुन घेणे आवश्यक आहे. त्यामुळे खेळाडु उमेदवाराने अर्जासोबत विभागीय उपसंचालक यांनी क्रीडा प्रमाणपत्र योग्य असल्याबाबत खेळाडु कोणत्या संवर्गासाठी पात्र ठरतो याबाबत प्रमाणित केलेले प्रमाणपत्र जोडणे आवश्यक राहील. वरील प्रमाणे पडताळणी केलेल्या क्रीडा प्रमाणपत्राची प्रत अर्जासोबत जोडली नसल्यास, सादरहु शासन निर्णयातील नियम ६ (आठ)(नऊ) नुसार सदरहु उमेदवाराचा खेळाडु संवर्गातुन विचार करता येत नाही.

सन २०१८ ची पोलीस शिपाई भरती प्रक्रियेसाठी जाहिरात दिनांक ५.२.२०१८ रोजी प्रसिध्द होण्याची शक्यता आहे. तरी खेळाडु उमेदवारांनी त्यांच्या खेळाच्या प्रमाणपत्रांची संबंधीत विभागीय उपसंचालक यांच्या कडुन पडताळणी करुन त्याबाबतचा अहवाल दिनांक ५.२.२०१८ पुर्वी प्राप्त करुन घ्यावा.

खेळाडु उमेदवारांनी त्यांच्या खेळाच्या प्रमाणपत्रांची संबंधीत विभागीय उपसंचालक यांच्या कडुन पडताळणी केल्या बाबतचा विहित कालावधीतील प्रमाणपत्र आवेदन अर्जासोबत नसल्यास अर्जदाराचा खेळाडु संवर्गातुन विचार करता येणार नाही.

**(दिपक देवराज)**
पोलीस उप आयुक्त (अभियान/पो.प्रवक्ते)
पोलीस आयुक्त कार्यालय, मुंबई.